MHND2500005962025

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.७३/२०२५ मधील नि.१ वरील आदेश</u>**
**<u>देविदास राजेपवाड व इतर विरुध्द एम.एस.ई.बी. कार्यालय भोकर</u>**

१. प्रस्तुतचा भारतीय वारसा कायदा, १९२५ मधील कलम ३७२ अन्वये वारसा दाखला मिळणेसाठी सादर केला आहे.

**<u>अर्जातील कथने थोडक्यात पुढीलप्रमाणे :-</u>**

२. अर्जदारांचे असे कथन आहे की, **साईराम देविदास राजेपवाड** हे **दिनांक ०५.१२.२०२०** रोजी तळेगाव ता उमरी जि. नांदेड येथे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ व २ हे मयत साईराम देविदास राजेपवाड यांचे आई-वडील आहेत. अर्जदार क्र.३ ह्या मयत साईराम देविदास राजेपवाड यांच्या बहीण आहेत. मयत साईराम देविदास राजेपवाड यांना प्रस्तुत प्रकरणातील परिच्छेद क्र. २ मधील अर्जदार शिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत साईराम हे त्यांच्या मृत्यूसमयी महावितरण कार्यालय भोकर येथे कार्यरत होते. त्यांच्या मृत्युनंतर अर्जदार क्र.३ यांना त्यांच्या जागी अनुकंपा तत्वावर Compassionate benefits मिळणे जरुरी आहे. त्यामुळे, त्यांनी वारसा प्रमाणपत्र (succession certificate) मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

३. गैरअर्जदार यांनी **(नि.क्र.१०)** वर हजर होवून म्हणणे दाखल केले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार वारसा प्रमाणपत्र (succession certificate) हे जंगम मालमत्ते संदर्भात बँक खाती, त्यामधील रक्कम, शेयर्स, कर्ज याबाबत दिले जाउ शकते. ते अनुकंपा तत्वावर Compassionate benefits मिळण्याकामी देता येणार नाही. त्यामुळे त्यांनी अर्जदार यांना वारसा प्रमाणपत्र देण्यात येवू नये व सदरचा अर्ज नामंजुर करावी अशी विनंती केलेली आहे.

४. अर्जदार यांनी मयत साईराम देविदास राजेपवाड यांचे मृत्यू प्रमाणपत्र **(नि.५/१)** दाखल केले आहेत. अर्जदार यांनी त्यांचे आधार कार्ड **(नि. ५/३ ते ५/५)** येथे दाखल केले. अर्जदार यांनी त्यांचे सिधापत्रीका **(नि.५/२)** येथे दाखल केले.अर्जदार यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, भोकर यांचे प्रमाणपत्र **(नि.५/६)** येथे दाखल केला आहे.

५.		अर्जदार क्र.३ संध्याराणी देविदास राजेपवाड यांनी **(नि.१२)** कडे स्वतःकरीता व इतर अर्जदारातर्फे सरतपासाचे शपथपत्र दिले आहे. तसेच, त्यांचे शपथेवरील कथन खोटे आढळल्यास त्याबाबत ते शिक्षेस पात्र राहतील.

६.		प्रस्तुतच्या अर्जाचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जदार यांनी अर्जदार क्र.३ यांना मयताच्या जागी महावितरण कार्यालय, भोकर येथे अनुकंपा तत्वावर Compassionate benefits मिळणेकामी प्रस्तुतचा प्रकरण दाखल केलेले आहे. परंतु, भारतीय वारसा कायदा, १९२५ चे कलम ३७२ नुसार वारसा प्रमाणपत्र (succession certificate) हे फक्त जंगम मालमत्ते संदर्भात बँक खाती, त्यामधील रक्कम, शेयर्स, कर्ज याबाबत दिले जाउ शकते. त्यामुळे अर्जदार यांना अनुकंपा तत्वावर Compassionate benefits मिळणेकामी वारसा प्रमाणपत्र (succession certificate) देता येणार नाही. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्जदारांचा अर्ज नामंजुर करणेत येत आहे.

२. प्रस्तुतचे प्रकरण बंद करण्यात येत आहे.

KULDIP SUBASHRAO KULKARNI
Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2026.04.09 16:01:27 +0530

दिनांक :-०९.०४.२०२६.
ठिकाणी :- उमरी

**(के. एस. कुलकर्णी)**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
उमरी.

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | G. B. Wavdhane,<br>Stenographer Gr. III<br>(On Deputation) |
| Court | - | CJJD & JMFC Umri |
| Date | - | 09.04.2026. |
| Order signed by the Presiding Officer on | - | 09.04.2026. |
| Order uploaded on | - | 09.04.2026. |